| MHRT140003052023 | **नियमित दिवाणी दावा क्र.१५३/२०२३**<br>(शरद रामचंद्र महाडीक<br>विरूध्द<br>किशोर कृष्णा महाडीक वगैरे) |
|---|---|

## निशाणी क्र. ४६ खालील आदेश

प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत अर्ज उक्त प्रकरणात नव्याने पुन्हा कोर्ट कमिशन करणेचे आदेश होणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१ चे कथन असे की, प्रस्तुत दाव्याचे कामी वादी यांचे अर्जावर नि.३८ वरती न्यायालयाने केलेल्या आदेशाप्रमाणे कोर्ट कमिशनर म्हणून उप-अधिक्षक, भूमी अभिलेख, मंडणगड यांची नेमणूक करून अहवाल सादर करणेसाठी आदेश झालेला होता. मात्र कोर्ट कमिशन यांनी दिलेला अहवाल हा चुकीचा असून न्यायालयाची दिशाभूल करणेसाठी बेकायदेशीर असा दिलेला आहे. वास्तविकत: दावा मिळकत मौजे अडखळ, ता. मंडणगड येथील सर्व्हे क्र.१०६/२१ ही मिळकत प्रतिवादी यांचे मालकीची असून सदरची मिळकत ही प्रतिवादी यांनी यापूर्वीच हद्द कायम मोजणी केलेली होती. सदरचे प्रतिवादी यांनी केलेल्या मोजणीच्या नकाशामध्ये सर्व्हे क्र.१०६/२१ या मिळकती मधून कोणताही टाकवली ते मंडणगड हा मुख्य रस्ता अगर कोणताही रस्ता जात नाही असे स्पष्ट दिसत असताना देखील कोर्ट कमिशनर यांनी या न्यायालयात दाखल केलेल्या कोर्ट कमिशन अहवालासोबत दाखल केलेल्या नकाशात वेगळीच मिळकत दाखवून प्रतिवादीचे सर्व्हे क्र.१०६/२१ या मिळकतीमध्ये टाकवली ते मंडणगड हा मुख्य रस्ता असल्याचे वादीचे दबावाखातर दाखविल्याचे दिसत आहे.

३. प्रतिवादी पुढे असे कथन करतात की, वादीचे कोर्ट कमिशन नेमणेचे अर्जात नमुद केलेप्रमाणे प्रतिवादीचे सर्व्हे क्र.१०६/२१ या मिळकती मध्ये प्रतिवादीचे मालकीचे असणाऱ्या सर्व प्रकारच्या बांधकामाबाबत अहवाल मागितलेला होता. तसेच प्रतिवादीचे सर्व्हे क्र.१०६/२१ या मिळकतीमध्ये प्रतिवादी यांच्या मालकीचे शेतघर

देखील आहे असे कैफियत मध्ये स्पष्ट नमूद देखील असताना कोर्ट कमिशनर यांनी सर्व्हे क्र.१०६/२१ या मिळकतीमधील असणाऱ्या बांधकामाबाबत उलेख केलेला नाही. सबब, कोर्ट कमिशनर यांनी न्यायालयाने केलेल्या आदेशाप्रमाणे कोणतेही काम न करता अर्धवट व चुकीच्या पद्धतीने काम करून चुकीचा अहवाल न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब, दावा मिळकतीची खरी वस्तुस्थिती रेकॉर्डवर आलेली नाही. सबब, या दाव्याचे कामी दाखल केलेला कोर्ट कमिशनर अहवाल हा अपुरा व चुकीचा असलेने नि.३८ नव्याने कोर्ट कमिशन नेमणेची तसेच पूर्वीच्या कोर्ट कमिशनर यांचेपेक्षा वरिष्ठ अधिकारी यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करून अहवाल मागविणेचे आदेश करणेची विनंती केली आहे.

**४.** वादींनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करून असे कथन केले आहे की, प्रतिवादीचा अर्ज हा बेकायदेशीर असून वादीने अभिलेखावर आणलेल्या कोर्ट कमिशन अहवालावर प्रतिवादी पुनर्मोजणी करून मागू शकत नाही. प्रतिवादी क्र.१ हा त्याचे पुराव्याचे वेळी स्वतंत्रपणे कोर्ट कमिशनर यांचे नेमणूकीची मागणी करू शकतो. सबब, प्रतिवादीचा अर्ज खर्चासह फेटाळणेत यावा.

**५.** प्रतिवादी क्र.१ चे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, कोर्ट कमिशनर यांनी चुकीच्या पध्दतीने मोजणी करून चुकीचा व अपुरा अहवाल दाखल केलेला आहे. वादीच्या नि.२३ वरील अर्जाच्या मागणीप्रमाणे, कोर्ट कमिशनर यांनी मोजणी केलेली नाही. प्रतिवादी हा प्रस्तुत अर्जान्वये कोणत्याही फेरमोजणीची मागणी करीत नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजूर करून नव्याने दावा मिळकतीची मोजणी होऊन तसा अहवाल दाखल करणेचे निर्देश कोर्ट कमिशनर यांना द्यावेत. याउलट, वादीतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादीने दावा मिळकतीच्या मोजणीसाठी अर्ज केला होता. तो मंजूर होऊन त्याप्रमाणे मोजणी करणेत आलेली आहे. तसेच त्याचा अहवाल न्यायालयात दाखल केलेला आहे. सबब, प्रतिवादीला पुन्हा मोजणी करून मागणेचा कोणताही हक्क व अधिकार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करणेत यावा.

**६.** प्रस्तुत अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील इतर दस्तांचे अवलोकन केले.

वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, वादीने नि.२३ वर अर्ज दाखल करून कोर्ट कमिशनरची नेमणूक होऊन दावा मिळकतीमधील वस्तुस्थिती दर्शविणारा अहवाल मागविणेत यावा अशी मागणी केली होती. सदर अर्ज मंजूर होऊन त्याप्रमाणे कोर्ट कमिशनर यांनी दावा मिळकतीतील वस्तुस्थिती दर्शविणारा अहवाल व नकाशा नि.३९ सोबत दाखल केलेला आहे.

**७.** प्रतिवादीचे कथनानुसार, कोर्ट कमिशनर यांनी चुकीचा व अपुरा अहवाल दाखल केलेला आहे. परंतु प्रतिवादीला सदर अहवालास आक्षेप असलेस सदर अहवाल चुकीचा असलेचे सिध्द करणेसाठी तो योग्य तो पुरावा दाखल करू शकतो. तसेच सदर अहवाल त्याला मान्य नसलेस तो अहवालावर त्याचे म्हणणे दाखल करू शकतो. सबब, वरील सर्व कारणांचा विचार करीता, प्रस्तुत प्रकरणात एकदा दावा मिळकतीच्या वस्तुस्थितीचा अहवाल दाखल झालेला असताना पुन्हा त्याच मुद्यावर कोर्ट कमिशनरची पुन्हा नेमणूक करणे न्यायोचित ठरणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर होणेस पात्र आहे. करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

अर्ज (नि.४६) नामंजूर करणेत येतो.

AMRUTA CHARUDATTA JOSHI

Digitally signed by AMRUTA CHARUDATTA JOSHI
Date: 2025.09.15 13:27:06 +0530

**स्थळ : मंडणगड** **(अमृता चा. जोशी)**
**दिनांक : १२/०९/२०२५** **दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंडणगड.**

| **CERTIFICATE** | | |
|---|---|---|
| **I affirm that the contents of this Pdf file judgment/order are same words as per original judgment/order.** | | |
| **Court Name** | :- | **Lok Adalat, Mandangad (Civil Judge, J.D. & J.M.F.C., Mandangad, Taluka Mandangad, District- Ratnagiri.)** |
| **Name of Stenographer** | :- | Shri. A. J. Sagvekar |
| **Date of Decision** | :- | 12/09/2025 |
| **Judgment/order signed by P.O. on** | :- | 12/09/2025 |
| **Judgment/order uploaded on** | :- | 15/09/2025 |